University Grants Commission, New Delhi Recognized Journal No. 41311
ISSN: Print: 2347-5021 www.research-chronicler.com ISSN: Online: 2347-503X

# रयत शिक्षण संस्थेची शंभरी – संस्थेच्या स्थापनेचा चिकित्सक अभ्यास

प्रा.डॉ.संदीप विलासराव घोडके

राज्यशास्त्र विभाग प्रमुख,वीर वाजेकर महाविद्यालय, फुंडे उरण *(महाराष्ट्र) भारत*

'कमवा व शिका' हे ब्रीद वाक्य घेऊन कर्मयोगी भाऊराव पायगोंडा पाटील यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेला या वर्षी शंभर वर्ष पूर्ण होत आहेत. संस्थेचे चिन्ह वटवृक्षाचे झाड हे आहे. स्थापनेपासून ते आतापर्यंतचा विस्तार हा या बोध चिन्हाप्रमाणे म्हणजे वटवृक्षाप्रमाणेच झाला आहे.

४ ऑक्टोबर १९१९ (दसरा, विजयादशमी) या दिवशी काले, कराड येथिल सत्यशोधक परिषदेत बहुजनांच्या शिक्षणासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेची घोषणा केली. प्रचंड जिद्द, मेहनत, प्रतिकूल स्थितीवर मात करण्याच दांडगा आकलन व त्यासर्व प्रयत्नांना धर्मपत्नी सौ. लक्ष्मीबाई (वहिनी) यांची कार्यकंची समर्थ साथ यामुळेच हा रयत शिक्षण संस्थेचा डोलारा यशस्वी चालविता आला. अशा संस्थेला १०० वर्षे पूर्ण होत आहेत याचा माझ्या सारख्यांच्या तीन पीढयांचा संस्थेशी संबंध आलेल्या व्यक्तीस निश्चितच अभिमान आहे. माझ्या आजोबांनी देशभक्त बाबूराव घोडके यांनी आपल्या गावांत (भोसे, ता. पंढरपूर) रयत शिक्षण संस्थेची शाळा सुरु व्हावी यासाठी वस्ती गांवोगावी जाऊन देणग्या, मुले गोळा केली. स्वत:च्या दोन मुलींना मुंबईच्या शाळेतून काढून भोसेच्या शाळेत दाखल केले. त्याच शाळेत ज्युनियर कॉलेज सुरु व्हावे म्हणून मी शाळेत असतांना त्यासाठीचा निधी गोळा करण्यासाठी महाजन सर यांच्या मार्गदर्शनाखाली सिनेमाची तिकिटे बाजारात विकली. हेच काम पुढे राजापूर सारख्या डोंगरी, कोकणी भागातही २५ वर्षापूर्वी करण्याचे मला पुण्य लाभले. सर्व प्रत्येक शाखा, कॉलेज यांच्या स्थापनेला मोठा इतिहास आहे. सध्याच्या पिढीला रयतच्या सध्याच्या शाखा व त्याचा भौतिक, क्षैक्षणिक विकास ज्ञात असावा. पण संस्थेच्या स्थापनेचा, तत्कालीन स्थितीची माहिती व्हावी यासाठी रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेचा चिकित्सक अभ्यास करण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे.

**'रयत'च्या स्थापने पूर्वीची तत्कालिन परिस्थिती :—**

फार पुर्वीपासून ब्राम्हण समाजाचं देशावर अधिराज्य होतं. पेशवाईच्या उदयानंतर तर ब्राम्हणांचं वर्चस्व वाढत गेलं. महाराष्ट्रात सर्व अधिकारपदावर फक्त त्यांचीच वर्णी चालू लागली. इतर समाजातील माणूस कितीही पराक्रमी अगर कर्तबगार असला तरी अधिकारपदापासून त्यांला वंचित ठेवण्यात येऊ लागले. त्या काळात सावकारही ब्राम्हण समाजाचेच होते. दयामायेचा त्यांच्यात लवलेशही नव्हता. येवढया तेवढया रकमेसाठी ते शेतकरी

कर्जदारांच्या जमिनी हिसकावून घेत. खोटे दस्तऐवज करुन गुरेढोरे ओढून नेत.

त्या काळी शिक्षणातही फक्त त्यांचीच मक्तेदारी होती. इतर समाजातील माणसानं शिक्षण घेणं हा त्या काळी घोर अपराध मानला जाई. सरकार दरबारी जमा होणारा कर पेशवे फक्त स्वत:च्या छंदाफंदासाठी आणि जेवणावळी उठवण्यासाठी करत. त्यांना देण्यात येणाऱ्या दक्षिणांचा खर्चही सरकारी तिजोरीवर पडे.

शूद्रांची स्थिती तर याहून दयनीय होती. त्यांच्या पेक्षा कुत्र्यामांजरांनाही चांगली वागणूक मिळे. शूद्रांना रस्त्यावरुन जाताना गळयात मडकं बांधून फिरावं लागे. कारण त्यांना रस्त्यावर थुंकायला बंदी होती. रस्त्यावरुन फिरताना त्यांना पाठी झाडाची फांदी बांधून फिरावं लागे. कारण शूद्र रस्त्यावरुन चालताना रस्त्यावर त्याची पावले उठत ती या फांदीनं पुसली जावीत अशी त्या मागची भावना होती. या पेक्षा भयंकर गोष्ट म्हणजे ब्राम्हणांच्या अंगावर शूद्रांची सावली जरी पडली तरी त्याला मरेस्तोवर मार दिला जाई. एखादया शेतकऱ्याचा शेतसारा चुकून एखादे वेळी भरायचा राहिला तर त्याला पाठीवर ओणवं उभं करुन पाठीवर मोठ्ठा दगड ठेवला जाई किंवा त्याच्या पत्नीला त्याच्या पाठीवर बसवून खालून मिरच्यांची धुरी दिली जाई.

या ब्राम्हणी वर्चस्वाला प्रथम एका देवासारख्या माणसानं छेद दिला तो म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले. या महात्म्यानं स्वत: तर शिक्षण घेतलंच पण स्वत:च्या पत्नीला म्हणजेच सावित्रीबाईंना शिकवलं. त्या काळात स्त्रीनं शिकणं म्हणजे महापातक समजले जाई. त्योतिबा आणि सावित्रीबाईंनं शूद्रांच्या आणि स्त्रियांच्या शिक्षणासाठी शाळा सुरु केल्या. ब्राम्हण समाजाच्या ढोंगी वागणुकीवर कोरडे ओढले. कठोर प्रहार केले. त्योतिबांचं वागणं म्हणजे नुसतं बोलाचीच कडी आणि बोलायचाच भात असं नव्हतं तर बोले तैसा चाले त्याची वंदावी पावले असं होतं. त्या काळात कोणीही कल्पना करणार नाही. अशी गोष्ट त्यांनी केली. आपल्या घरातला पाण्याचा हौद त्यांनी शूद्रांसाठी खुला केला. विधवा विवाहाचा पुरस्कार केला. अनेक विधुर आणि विधवांची लग्ने त्यांनी स्वत: लावून दिली.

ज्योतिबांनी ब्राम्हणांचं देवत्व संपवलं. अंधश्रध्दा मुळापासून फेकून देण्यासाठी प्रचंड प्रयत्न केले. हे सगळं एकटयानं पुढं चालू ठेवता येणार नाही हे लक्षात येताच 'सत्यशोधक समाज' नावाच्या संघटनेची स्थापना केली. शूद्रांची आणि अतिशुद्रांची मानसिक गुलामगिरीतून मुक्तता करुन त्यांना मानवी हक्कांची जाणीव करुन देवून त्यांची जपणूक करणं, पुरोहितांकडून होणाऱ्या अनन्वित अच्याचारातून त्यांना मुकत करणं ही या संघटनेची ध्येयं होती. सत्यशोधक समाजाचे सभासदत्व कोणत्याही धर्माच्या, कोणत्याही जातीच्या व्यक्तीला मिळू शकत होतं. अनेक पुरोगामी वृत्तीचे ब्राम्हण या संघटनेचे सभासद होते. ज्योतिबा कधीही ब्राम्हणाचे व्यक्तिश: विरोधक नव्हते तर ते

ब्राम्हण्यवादाचे विरोधक होते. त्योतिबांना मुळबाळं नव्हतं म्हणून त्यांनी एका ब्राम्हण विधवेच्या मुलाला यशवंताला दत्तक घेतलं.

याच ज्योतिबांच्या वारसा पुढं कोल्हापूरच्या शहूछत्रपतींनी आणि बडोदयाच्या सयाजीराव गायकवाडांनी पुढं समर्थपणे चालवला. बाबासाहेब आंबेडकर याच सयाजीरावांच्या शिष्यवृत्तीवर शिक्षणासाठी परदेशी गेले. भाऊराव पाटीलही खऱ्याअर्थानं या दोघांचे वारस होते. ते सत्यशोधक समाजाचे खंदे कार्यकर्ते होते. शाहूमहाराजांना गुरुस्थानी मानून त्यांची तळागाळातल्या लोकांच्या मुलांसाठी, शूद्रांच्या आणि अतिशुद्रांच्या मुलांसाठी शिक्षण प्रसाराचा, ज्ञानदानाचा पवित्र यज्ञ मांडला. रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. त्यांच्या या शिक्षण यज्ञाला धनिकांनी कधीच सढळ हातानं मदत केली नाही. या संस्थेच्या स्थापनेपासून आणि भाऊरावांच्या निधनानंतरही ही संस्था सर्वसामान्य जनतेच्या मदतीवर आणि प्रेमावरच चालली आणि चालत राहिली आहे.

भाऊरावही ज्योतिबांच्याप्रमाणे कधीच ब्राम्हणांचे द्वेष्टे नव्हते तर ते ब्राम्हण्याचे द्वेष्टे होते. विरोधक होते. अनेक पुरोगामी ब्राम्हणांचा या संस्थेच्या वाढीत भरीव वाटा आहे. बेडकिहाळ आणि जोशी नावाचे दोन शिक्षक संस्थेचे आजीव सेवक होते. रावबहादूर काळे तर संस्थेचे ध्यक्षही होते. त्यांनी संस्थेला आयुष्यभर सक्रिय मदत केली. त्यांचे जावई सुप्रसध्दि अर्थतज्ञ, पुणे विदयापीठाचे एकवेळचे कुलगुरु आणि भारताच्या नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष धनंजयराव गाडगीळ संस्थेच्या कार्याचे आणि भाऊरावांचे चहाते होते. संस्था त्यांच्या अखेरपर्यंत त्यांच्या सल्ल्याप्रमाणे चालली होती. त्यांच्यानंतर त्यांच्या पत्नी प्रमिलाबाई संस्थेच्या कार्यकारणीवर होत्या. संस्थेच्या उपाध्यक्षही होत्या.

### ✵ रयत शिक्षण संस्थेचा जन्म ✵

कराड जवळील काले या ठिकाणी सत्यशोधक समाजाची परिषद भरली. परिषदेचे अध्यक्ष होते, केशवराव बागडे. महाराष्ट्राच्या सर्व भागातील प्रतिनिधी त्या परिषदेस उपस्थित होते. ही परिषद ४ ऑक्टोबर १९१९ रोजी विजया दशमीच्या शुभमुहूर्तावर घेतली होती. पुण्याचे वकील केशवराव बागडे अध्यक्षस्थानी असतानाच भाऊराव पाटील बोलण्यास उठले. नुसत्या भाषणानी आणि परिषदांनी आपला बहुजन समाज सुधारेल असं मला वाटत नाही. बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी एक शिक्षण संस्था स्थापन करणे गरजेचे आहे. भाऊरावांची ही सुचना सर्व परिषदेस पसंत पडली. आवडलीही, शेवटी भाऊरावांनी त्या शिक्षण संस्थेस ‘रयत शिक्षण संस्था’ नाव दिल्याचे घोषितही केले. स्वत: कष्ट करुन शेती पिकवणाऱ्या कष्टकऱ्याला ‘रयत’ म्हणत छत्रपती शिवाजी महाराज सुध्दा आपल्या प्रिय प्रजेला ‘रयत’ म्हणत. त्याच दिवसापासून काले या ठिकाणी वसतीगृह झाली. काले येथील कार्यकर्ते दाजी पाटील, नरुकाका खोत, भाऊराव चौगुले यांनी या वसतिगृहाला मोठे योगदान

दिले. या वसतिगृहाची दैनंदिन व्यवस्थेची जबाबदारी विठ्ठल बाळकृष्ण खटावकर यांनी सांभाळली होती.

या वसतिगृहाला भाऊराव सवड मिळेल तशी भेट देत असत. काले येथील या वसतिगृहात मराठा, जैन, लिंगायत, कोष्टी, कुंभार, परीट, न्हावी, मुसलमान, हरिजन वगैरे विविध जाती धर्मांची मुले एकत्र गुण्यागोविंदाने राहत होती. मुलांच्या व्यायामाकरिता दांडपट्टा, मल्लखांब, फुटबॉल, लेझीम, हलगी वगैरे साधनेही त्या वसतिगृहात ठेवली होती. त्यावेळी भाऊराव किर्लोस्कर कारखान्यात विक्रेता म्हणून काम करीत होते. शैक्षणिक कार्याकडे नीटपणे लक्ष देता येत नव्हते. याची खंत त्यांच्या मनाला लागायची. त्यांनी किर्लोस्कर विक्रेतेचा राजीनामा देण्याचे ठरवले. राजीनामा पत्र घेवून ते लक्ष्मणराव किर्लोस्करांच्या समोर ठेवले.

लक्ष्मणराव म्हणाले, ''कां? कशासाठी राजीनामा देताय?''

भाऊराव— ''मला माझे आवडते शैक्षणिक व सामाजिक कार्य करावयाचे आहे. यासाठी मी राजीनामा देत आहे. या कार्यासाठी मी पूर्ण वेळ देवून आयुष्यभर वाहून घेणार आहे.''

लक्ष्मणराव, ''भाऊराव तसे तुम्ही करु नका तुम्हांला संसार आहे. भावंड आहेत. सर्व जबाबदारी आहे. तुम्हाला आम्ही चांगला पगार देतोय. हवा तर आणखी वाढवतो. तुम्ही असा धाडसी निर्णय घेवू नका. तुम्हांला आम्ही नोकरी न सोडता तुमच्या आवडीचे कार्य करण्यास आता सोडतोयच पुढे आणखी जास्त वेळ सोडेन.''

लक्ष्मणरावांनी भाऊरावांच्या कार्याबद्दल व नोकरीतील कामाबद्दल गौरव उद्गार काढले. शेवटी भाऊरावांच्या अट्टाहासापोटी त्यांनी १ नोव्हेंबर १९२१ रोजी राजीनामा मंजूर केला.

१९२१ मध्ये नेर्ले तालुका वाळवा या ठिकाणी भाऊरावांनी वसतिगृह सुरु केले. रयत शिक्षण संस्थेमार्फत काले येथील वसतिगृहाच्या धर्तीवरच नेर्ले येथेही सुरु केले. यासाठी ज्ञानदेव भाऊ पाटील, नारायण रावजी पाटील, आनंदा दादासाहेब पाटील, यशवंत नारायण रणखांबे, डी.आर.पाटील इत्यादी कार्यकर्त्यांनी भाऊरावांना मोठे योगदान दिले. त्याचप्रमाणे विदयार्थी दशेतच बा. म.ठोके, एस.डी.महादार यांचेही योगदान लाभले.

या ठिकाणच्या वसतिगृहासाठी दोन उपक्रम भाऊरावांनी राबवले. पहिला उपक्रम त्या काळी दळपासाठी गिरण्या नव्हत्या. भगिनी पहाटे कोंबडा ओरडला की उठत व जात्यावर ओव्या गात दळण करत. हा त्यांचा कायमचाच धंदा असे. नेर्ले व परिसरातील सर्व खेडयात घरोघरी जात्यांच्या शेजारी खुंटीला एक पिशवी अडकली असे. त्या पिशवीत पसाभर धान्य टाकायचे. नंतरच मग दळप करायचे. त्या पिशवीत साठलेले धन्य आठवडयाला जमा करायचे. विदयार्थ्यांना जेवणासाठी तेच धान्य पुरे होई. या योजनेला मुष्टीफंड योजना म्हणत. दुसरा उपक्रम प्रत्येक वर्षी शेतसारा तलाठी जमा करायचा. त्या

शेतसाऱ्याच्या प्रमाणात शेतसाऱ्याबरोबर देणगींही जमा करायची. कमी शेतसाऱ्याच्या शेतकऱ्याला कमी देणगी, जास्त शेतसारा असणाऱ्या शेतकऱ्याला जास्त देणगी हा ही एक उपक्रम नेर्ले वसतिगृहासाठी भाऊराव पाटलांनी राबवला.

अशा पध्दतीने रयत शिक्षण संस्थेची स्थापना होऊन विकास होऊ लागला.

''स्वावलंबी शिक्षण योजना''

(कमवा व शिका)

शिवाजी कॉलेजमध्ये निधर्मी तत्त्वावर सर्व विदयार्थ्यांनी एकत्र राहुन बाजारहाट करणे, दळून आणणे, शेतीची सर्व कामे करणे, इमारत बांधकामाची, मजुरीची कामे करणे, खडी फोडणे, जनावरांची निगा राखणे, भाजीपाला व दूधविक्री करणे आणि त्यांचा हिशेब ठेवणे, इ. सर्व कामे विदयार्थ्यांना करावी लागत. ही कामे करताना विदयार्थ्यांना भाऊराव स्वत: मार्गदर्शन करीत.

सुट्टीचे दिवशी विदयार्थी जास्त वेळ काम करीत. शेतातच झाडाखाली वसून सामुदायिकरित्या जेवण घेत. साताऱ्यात भाऊराव असले तर ते विदयार्थ्यांचे कामावर देखरेख करीत. भाऊराव स्वत: या विदयार्थ्यांचे बरोबर जेवण घेत. हसत, खेळत, विनोद करीत जेवणाचा कार्यक्रम पार पडे. भाऊराव हे विदयार्थ्यांबरोबर असल्याने विदयार्थ्यांच्या आनंदाला पारावार राहत नसे आणि कामाचा उरकही चांगला होत असे. भाऊराव हे विदयार्थ्यांना अनेक सूचना देत. बहुसंख्य विदयार्थी हे ग्रामीण भागातील असल्याने त्यांना कष्ट करताना संकोच वाटत नसे. शिवाय या कॉलेजमध्ये श्रमाला प्रतिष्ठा असल्याने विदयार्थ्यांना काम करताना हौस वाटे.

या विदयार्थ्यांना कामाचा मोबदला पैशाच्या स्वरुपात दिला जाई. तेवढयाच रकमेच्या फी मध्ये सवलत मिळे व तेवढीच रक्कम लक्ष्मीबाई स्मारक शिक्षण फंडातून बिनव्याजी कर्ज दिली जाई. अशा रितीने या मिळकतीमधून त्यांच्या राहण्याचा, भोजनाचा व फी चा खर्च भागे. या श्रमयोजनेचा दरवर्षी पुढे पुढे दोनशे—तीनशे विदयार्थ्यांना फायदा घेता येव लागला. या मुलांची राहणी साधी असे. कष्टामुळे प्रकृती निकोप राही. हे विदयार्थी नियमित अभ्यास करीत व हुषार विदयार्थ्यांबरोबर परीक्षेत गुण मिळवीत. श्रम केल्याने विदयार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होतो या उपेक्षेला हे विदयार्थी चोख उत्तरे देत. त्यांची अभ्यासातही प्रगती असे.

काही शिक्षणतज्ञ भाऊरावांना सल्ला देत. हुशार मुले निवडून काढा. त्यांना श्रमयोजनेतून वगळा व खास शिकवण्या लावून अधिक हुशार करा. अशारितीने ही मुले अभ्यासात चमकतील व आपल्या संस्थेचेही नाव काढतील. यावर भाऊराव म्हणत, ''असे झाले तर श्रम करणारे व श्रम न करणारे यांचे गट' पडतील. श्रम न करणारे उच्च वर्णीयांप्रमाणे वागतील व श्रम करणाऱ्या विदयार्थ्यांना कमी लेखतील. हे तत्त्व मला मान्य नाही. प्रत्येकाने श्रम केलेच पाहिजेत. एखादा पालक मुलालाही जादा पैसा देवुन मुलास 'काम देऊ नका'

म्हणून विनंती करी. तेव्हा भाऊराव त्या पालकास परखडपणे सांगीत, ‘‘येवढा लाडका असेल तर घरी घेऊन जा. श्रमात सवलत नाही.’’ इतकी भाऊरावांची श्रमप्रतिष्ठेवर श्रध्दा होती.

मोफत व वसतिगृहयुक्त महाविदयालय चालविल्यामुळे या कॉलेजला दरवर्षी लाखो रुपयांची तूट येई. परंतु भाऊराव हे वणवण हिंडून, देणगी जमा करुन तूट भरुन काढीत. गोरगरीब विदयार्थी श्रम करुन उच्च शिक्षण घेत आहेत हे चित्र डोळयापुढे दिसल्यावर त्यांना मानसिक समाधान लाभे. या समाधानामुळे त्यांना त्रासाचे काही वाटत नसे. तसे ते ध्येयवेडेच होते. त्या काळी अशा रीतीने चालणारे महाविदयालय हे भारतातील एकमेव असावे असे वाटते.

थोडक्यात अशिया खंडात श्रेष्ठ व सर्वात मोठी शिक्षण संस्था म्हणून रयत शिक्षण संस्थेचा उल्लेख होतो. त्याच्यानंतर, पूर्वी सुध्दा कांही शिक्षण संस्था स्थापन झाल्या व त्यांच्या संस्थापक, चालक यांनी समाजात शिक्षण महर्षी वगैरे पदव्या धारण केल्या त्यांच्या घराण्यातील लोकांनी ती संस्था चालविली, ताब्यातही ठेवली. पण रयतचे तसे अण्णांनी कधी केले नाही. स्वत:च्या कुटूंबातील कोणालाच त्यांनी संस्थेत नोकरीत घेतले नाहीच शिवाय ‘कमवा—शिका’ योजनेतून उत्पन्न घेणाऱ्या भाजी, दूध वगैरेंचाही जाणीवपुर्वक स्विकार केला नाही. अशा त्यागातूनच संस्था विस्तीर्ण झाली आहे व पुढेही काळाशी सुसंगत विस्तारत राहिल. कर्मवीर अण्णांच्या विचारातील रयत विदयापीठ लवकरच स्थापन होईल असा आशावाद व्यक्त करतो.

**संदर्भ सूची :**

१) कर्मवीर भाऊराव पाटील कार्य—विचार — सुभाष ढगे

२) प्रबोधनाची धगधगती मशाळ— मा. भि. काटकर

३) कर्मवीरायण — अजित पाटील

४) रयत शिक्षण संस्था अहवाल

५) लेखकाचे — वाचन—चिंतन